Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 479 – 482

DOI: 10.5281/zenodo.10135746

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींचे धार्मिक व सामाजिक तत्त्वज्ञान

प्रा. डॉ. माधव नरहरी कांबळे

विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग,संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट जि. लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: madhav358.2012@rediffmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रास्ताविक

महात्मा गांधीजी हे स्वातंत्र्य लढ्यातील जसे महानायक होते तद्वतच ते एक महान समाजसुधारकही होते. भारतातील मुलभूत धार्मिक व सामाजिक समस्यावर महात्मा गांधीजींनी केलेले भाष्य अत्यंत वास्तववादी असून याकडे दुर्लक्ष करून भारतीय समाजाची पुनर्रचना कोणालाही करता येणार नाही. आजच्या भारतीय समाजासमोरील धार्मिक व सामाजिक समस्या व आव्हाने सोडवण्यासाठी त्यांचे धार्मिक व सामाजिक चिंतन मार्गदर्शक व उपयुक्त ठरणारे आहे.

महात्मा गांधीजींनी भारतातील धार्मिक व सामाजिक समस्यांचा सखोल अभ्यास करून धार्मिक व सामाजिक परिवर्तनासाठी विविध चळवळी उभ्या केल्या होत्या. महात्मा गांधी यांची धर्म हिंदू धर्मावर आढळनिष्ठ होती परंतु इतर धर्माबद्दलही त्यांच्या मनात तेवढाच आदर होता. त्यांचे धर्मविषयक चिंतन व आकलन मूलभूत स्वरूपाचे होते त्यांच्या मते, कोणताही धर्म श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून सर्व धर्म समान असतात. परमेश्वर हाच जवळजवळ प्रत्येक धर्माचे उगमस्थान असल्याने प्रत्येक धर्मातून सत्याचा आविष्कार होत असतो व सर्व धर्माच्या शिकवणीचा सार मानव कल्याण हाच असतो. त्यामुळे प्रत्येक धर्म अनुयायाने आपले अंगी सर्वधर्मसमभाव हे मूलतत्त्व बाळगल्यास आपल्या धर्माविषयी असलेले आंधळे प्रेम अधिक ज्ञानमय व सात्विक होण्यास मदत होते असे त्यांना वाटते.

आज मानव धर्मातील शाश्वत मूल्यांना सोडून संकुचित कर्मकांडांमध्ये अडकून पडला असल्यामुळे मानवी मूल्यांना महत्त्व देण्याऐवजी धार्मिक भावनांना अधिक महत्त्व देत आहे. या धार्मिक वृत्तीमुळे अतिरेकी धर्माभिमान जोपासला जाऊन धार्मिक आतंकवादामध्ये त्याचे रूपांतर होताना दिसून येत आहे. इतर धर्माबद्दल अज्ञान हेच यामागील कारण आहे असे गांधीजी म्हणतात. समाजातील धार्मिक द्वेष , मत्सर दूर करून धार्मिक ऐक्य, सहिष्णुता, शांतता, बंधुता, प्रेम अशा मानवी मुल्यांच्या आधारे प्रगतिशील समाज निर्माण करण्यासाठी महात्मा गांधीजीचे धर्मविषयक चिंतन आजही उपयुक्त

आहेत. तसेच भारतीय समाज हा विविध जाती, धर्म, वंश, वर्ण, वर्ग व भाषा यात विभागला असल्यामुळे ब्रिटिशांनी हिंदू मुस्लिम लोक जोपर्यंत एकत्र येणार नाहीत तोपर्यंत आपल्या सत्तेला कोणीही हलवू शकणार नाही हे ओळखून 'फोडा, जोडा व राज्य करा' या राजनीतीचा वापर केल्यामुळे भारतीय समाजातील जातीय एकतेला बाधा आला होता. हिंदू-मुस्लिम या धर्म गटात ऐक्य व सामाजिक समन्वय निर्माण झाल्याशिवाय भारतीय समाजाची प्रगती होऊ शकत नाही हे वास्तव गांधीजींनी ओळखून भारतीय समाज एकसंघ करण्यासाठी अत्यंत दूरदृष्टीने धार्मिक व सामाजिक ऐक्याचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

**संशोधनाची उद्दिष्टे**

महात्मा गांधीजीचे धार्मिक व सामाजिक विचाराचे आधुनिक संदर्भात विश्लेषण करणे.

**गृहीतके**

समताधिष्ठित एकसंघ भारतीय समाज निर्माण करण्यासाठी महात्मा गांधी यांचे धार्मिक व सामाजिक विचार भारताला मार्गदर्शक व उपयुक्त ठरणारे आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक व वनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन**

सत्य संकलनासाठी प्रथम व दुय्यम्स्रोतांचा आधार घेऊन महात्मा गांधीजींच्या धार्मिक व सामाजिक विचार आजच्या समाजासाठी असे उपयुक्त आहेत हे मांडण्याचा प्रयत्न सदरील शोधणे मनात करण्यात आला आहे

**महात्मा गांधीचे धार्मिक व सामाजिक चिंतन**

भारतीय समाजात धार्मिक व सामाजिक ऐक्य निर्माण व्हावे यासाठी गांधीजींनी अनेक विचार मांडले आहेत. ऐक्य म्हणजे बाहेरून लादलेले केवळ राजकीय ऐक्य नसून ते अभेद्य ऐक्य असते जे कोणत्याही आमिषाला बळी न पडता कायमस्वरूपी टिकून राहते. सामाजिक ऐक्य म्हणजे केवळ हिंदू मुस्लिम यांचे ऐक्य नसून या भारत भूमीमध्ये राहणाऱ्या हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, ईसाई, बौद्ध, जैन, पारशी इत्यादी धर्माचे ऐक्य होय.

**१. सामाजिक एकतेसाठी धर्माविषयीचा योग्य दृष्टिकोन आवश्यक**

महात्मा गांधीच्या मते, हिंदू-मुस्लिम यांच्यातील धार्मिक दृष्टिकोनातील फरकामुळे त्यांच्यात तणाव निर्माण होतो त्यामुळे सामाजिक ऐक्यासाठी धर्माविषयीचा योग्य दृष्टिकोन आवश्यक आहे. सर्व धर्मातील मूल्यांचा सखोल विचार केला असता सर्व धर्मातील मूल्य सारखेच आहेत हे जेव्हा सर्वांना समजेल तेव्हा धर्माधर्मात सामाजिक ऐक्य प्रस्थापित होण्यास वेळ लागणार नाही.

### २. धर्म व मैत्रीचा आधार प्रेमाच आहे

महात्मा गांधींच्या मते, धर्माचा आधार जसा प्रेम आहे तसाच हिंदू व मुस्लिम यांच्यातील मैत्रीचा आधार सुद्धा प्रेमाच आहे. विविध धर्माचे अनुयायांनी जर प्रेमाच्या रस्त्याने गेले तर त्यांच्यात निश्चितच सामाजिक सामाजिक ऐक्य व सामंजस्य निर्माण होईल. इस्लाम शब्दाचा अर्थ शांती असा आहे.  तसेच बौद्ध धर्मातही शांतीचा संदेश देण्यात आला आहे तर जैन धर्माने 'अहिंसा परमोधर्म' हे तत्व मानले आहे. त्यामुळे सर्व धर्माची शिकवण ही मानवाला शांतीप्रदान करणारीच आहे असे गांधीजींची ठाम भूमिका होती.

### ३. धर्म हा कोणत्याही राष्ट्रीयत्वाची कसोटी नसतो

महात्मा गांधींच्या मते, धर्म हा कोणत्याही राष्ट्रीयत्वाची कसोटी नसतो तो तर परमेश्वर आणि मानव यांच्यातील आंतरिक विचार असतो. सर्व धर्म व संप्रदायांची माणसेही राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने भारतीयच आहेत त्यामुळे माझे जेवढे प्रेम हिंदूवर आहे तेवढेच प्रेम मुसलमावर देखील आहे. माझे ह्रदय चिरले तर माझ्या ह्रदयात हिंदू व मुस्लिम व इतरांसाठी वेगळे कप्पे नाहीत हा महात्मा गांधींचा विचार सर्वांनी आचरणात आणला तर सामाजिक ऐक्य व सामंजस्य निर्माण होण्यास जास्त वेळ लागणार नाही.

### ४. सर्व धर्माचा आदर करावा

भारतात विविध धर्माचे लोक एकत्र राहत असल्याने भारत हा जेवढा हिंदूंचा आहे तेवढाच तो इस्लाम, पारसी, ख्रिश्चन, शिख, बौद्ध यांचाही आहे त्यामुळे ज्या धर्माचे आपण असो त्या धर्माचा जरूर आदर करावा परंतु इतर धर्माचा देखील आदर केला तर समाजात धार्मिक समन्वय निर्माण होते. ज्या माणसाला जो धर्म आवडत असेल त्याला तर धर्माचा स्वीकार करता आला पाहिजे परंतु त्यातून मानवतेच्या जवळ जाऊन उच्च मानवता वाढीस लागली पाहिजे. धर्माधर्मात सदभाव वाढीस लागला पाहिजे असे गांधीजींना वाटत असे.

### ५. महात्मा गांधींच्या दृष्टीने धर्म ही एक जीवन पद्धती आहे

महात्मा गांधीच्या दृष्टीने धर्म ही एक जीवन पद्धती आहे यात रुढीला कोणते स्थान नाही मानव सेवा हाच खरा धर्म असून सर्व मानव जात एक आहे त्यांचा परमेश्वर एकच असून सर्वच माणसे त्यांचीच मुले आहेत त्याला कोणी प्रिय कोणी अप्रिय असे नसते त्याचे सर्व सारखेच प्रेम असते त्यामुळे आपण आपल्यावर जेवढे प्रेम करतो तेवढेच प्रेम आपल्या शेजाऱ्यावरही केले पाहिजे. प्रत्येक धर्म इतर धर्माशी विरोधी नसून पूरकच असतात. जे एका धर्मात नसते ते इतर धर्मात असते त्यामुळे इतर धर्माचा द्वेष न करता श्रेष्ठ कनिष्ठता न मानता सर्व धर्मातील अनुयायांनी मिळून मिसळून राहिले तरच समाजात सामाजिक ऐक्य व सामाजिक समन्वय निर्माण होईल असे गांधीजींची भूमिका होती.

### ६. महात्मा गांधींचे समाजचिंतन

भारत हा भिन्नधर्मी देश असून भारतासारख्या भिन्न धर्म, वंश , जात, वर्ण, वर्ग आणि पंथ असलेल्या देशामध्ये सामाजिक ऐक्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकणार नाही. या सामाजिक ऐक्यासाठी महात्मा गांधीजींनी आपल्या कृतीतून दिलेला संदेश मानव जातीसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. प्रत्येकाने इतर धर्मीयांच्या सुखदुःखात असणे

सहभागी झाले पाहिजे, इतर धर्मियांशी मैत्रीचे नाते जोडून त्यांना आपल्या सणसमारंभात आमंत्रण दिले पाहिजे, संकट समयी एकमेकांना मदत केली तसेच स्वतःच्या धर्मग्रंथाप्रमाणेच इतरांच्या धर्मग्रंथांचे वाचन केले तर धर्माधर्मात सहिष्णूता निर्माण होऊन भारतात शांतता प्रस्थापित होईल व भारत प्रगती करू शकेल.

भारताला प्रगतशील राष्ट्र बनवण्यासाठी राजकीय नेत्यांची सुद्धा भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. राजकीय नेत्यांनी स्वतःच्या सत्तेच्या स्वार्थासाठी भिन्नधर्मीय लोकांमध्ये विषमता न करता सामाजिक व धार्मिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न करावा हा महात्मा गांधीजीनी दिलेला संदेश आजच्या राजकारणाला व राज्यकर्त्यांना दिशादर्शक असून जात, धर्म, वंश, भाषा या आधारे समाजाचे विघटन टाळून सामाजिक, राजकीय, धार्मिक व राष्ट्रीय ऐक्य टिकवण्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे. तसेच भारतीय समाज कोणत्या सामाजिक व नैतिक मूल्यावर आधारित असावा हेही महात्मा गांधीजींनी स्पष्ट केले आहे.

आज जात, धर्म, वंश व वर्णाच्या आधारे शिक्षणसंस्था, दवाखाने, देवालय यांची उभारणी न करता मानवी समतेच्या दृष्टिकोनातून त्याची उभारणी करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**

१. बाळासाहेब भारदे, गांधी विचार दर्शन, जातीय खंड १० महात्मा गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे

२. मोहन करमचंद गांधी, विधायक कार्यक्रम नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद २००८

३. नागोराव कुंभार, संपादकीय महात्मा गांधी विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातूर १९९५

४. मोहन करमचंद गांधी, सर्वधर्मसमभाव, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे

५. मोहन करमचंद गांधी, माझे सत्याचे प्रयोग, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद

६. बाळासाहेब भारदे, सर्वधर्मसमभाव व सामाजिक समता, राष्ट्रीय एकता समिती, महाराष्ट्र

७. नागोराव कुंभार, महात्मा गांधींचे सामाजिक तत्त्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातूर २०१२

८. महात्मा गांधी, मंगल प्रभात परमधाम प्रकाशन, २००७

९. वामन पाटील, अंक २ पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे २००५

१०. जोशी ज.वा., धर्माचे तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

११. लोकराज्य महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन, मुंबई